जनसंपर्क कक्ष
29 NOV 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'लोकस्मृती' विद्यार्थिनी वसतिगृहाला मेनन यांचेकडून साडेसहा लाखांचा निधी

## उद्योजक सचिन मेनन यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे निधी केला सुपूर्द

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थी वसतिगृहासाठी कोल्हापुरातील मेनन पिस्टन्स लि. कंपनीचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांनी साडेसहा लाखांचा निधी दिला आहे. हा निधी त्यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

विद्यापीठाने लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह हा सुमारे शंभर विद्यार्थिनींच्या निवासासाठीचा प्रकल्प प्रस्तावित आहे. हे वसतिगृह लोकसहभागातून उभारावे आणि त्यातून लोकांच्या स्मृती जतन कराव्यात, अशी वसतिगृहाची संकल्पना मांडली. लोकांनी आपले कुटुंब, आप्तस्वकीय यांमधील प्रिय व्यक्तींच्या नावे ठराविक निधी विद्यापीठाकडे दिला, त्या व्यक्तींच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करावयाची आहे. यानुसार उद्योजक सचिन मेनन यांनी विद्यापीठास साडेसहा लाख रुपयांचा निधी दिला आहे. मेनन यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी संभाजी पाटील यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निधीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजीत यादव उपस्थित होते.




**कोल्हापूर : उद्योजक सचिन मेनन यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे निधी सुपूर्द करताना संभाजी पाटील. सोबत रणजीत यादव, डॉ. गिरीष कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.**

### विविध घटक मदतीसाठी इच्छुक: कुलगुरू डॉ. शिर्के

शिवाजी विद्यापीठाशी संबंधितांसह समाजातील विविध संस्था-संघटनांशी तसेच उद्योग-व्यवसायांशी निगडित घटकांकडूनही लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह प्रकल्पास मदत केली जात आहे. अनेकांनी आपण लवकरच निधी सुपूर्द करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे विद्यापीठामध्ये शंभर टक्के लोकसहभागातून साकारत असलेला हा प्रकल्प कोल्हापूरकरांच्या दातृत्वातून निश्चितपणे पूर्णत्वास जाईल, अशी भावना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2023

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठातील सैफ-डीएसटी केंद्रातील ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप पाहणीप्रसंगी प्रा. जे-जून ली. सोबत प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. हेमराज यादव.

# विद्यापीठातील सैफ-डीएसटी सुविधांमुळे गुणवत्तापूर्ण संशोधनाला चालना मिळेल

## प्रा. जे-जून ली; सैफ-डीएसटी केंद्राला भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील सैफ-डीएसटी ही कार्यक्षम, प्रभावी सुविधा आहे. यामुळे गुणवत्तापूर्ण संशोधनाला चालना मिळेल, असे गौरवोद्‌गार कोरियातील डोंगगुक युनिव्हर्सिटीचे प्रा. ले-जून ली यांनी काढले.

'मीट द सायंटिस्ट' या स्कूल ऑफ नॅनोसायन्स विभागातर्फे आयोजित कार्यक्रमासाठी आले होते. शिवाजी विद्यापीठातील सैफ-डीएसटी केंद्रास त्यांनी भेट दिली. याप्रसंगी ते बोलत होते.

प्रा. ली म्हणाले, अत्याधुनिक उपकरणे एकाच छताखाली सुव्यवस्थित ठेवणे सोपे काम नाही. केंद्राचे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या नेतृत्वाखालील उत्कृष्ट प्रशासकीय व्यवस्थापन सुरू आहे. कोरियाच्या विद्यापीठातील काही नमुने येथे विश्लेषणासाठी पाठवायला आवडेल. शिवाजी विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू पी. एस. पाटील व कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्या पाठिंब्यामुळे हे केंद्र उत्कृष्ट सुविधा देत आहे. यावेळी डॉ. हेमराज यादव यांच्यासह संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2023
पुण्यनगरी

# विद्यापीठाची एसएआयएफ-डीएसटी प्रभावी सुविधा

## कोरियाचे प्रा. ली यांचे गौरवोद्‌गार

**कोल्हापूर :** अत्याधुनिक उपकरणे एकाच छताखाली सुव्यवस्थित ठेवणे इतके सोपे काम नाही. तरीही 'एसएआयएफ-सीएफसी'चे प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्या नेतृत्वाखाली येथील स्वच्छता, टापटीप आणि उत्कृष्ट प्रशासकीय व्यवस्थापन पाहून आश्चर्य वाटले, अशा शब्दांत दक्षिण कोरियातील डोंगगूक युनिव्हर्सिटीचे प्रा. जे-जून ली यांनी शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ-सीएफसी केंद्राचे कौतुक केले.

प्रा. जे-जून ली हे दक्षिण कोरियातील डोंगगूक विद्यापीठमध्ये ऊर्जा आणि साहित्य अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक आहेत. ते मीट द सायंटिस्ट या स्कूल ऑफ नॅनोसायन्स, शिवाजी विद्यापीठ आयोजित कार्यक्रमासाठी आले होते. प्रा. ली यांनी शिवाजी विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्याची इच्छा व्यक्त केली. त्याचबरोबर प्रा. सोनकवडे आणि डॉ. हेमराज यादव यांच्यासोबत कोलॅबरेशन करायला आवडेल, असेही ते म्हणाले. प्रा. सी. डी. लोखंडे आणि डॉ. जयवंत गुंजकर यांनीही प्रा. ली यांच्यासोबत दोन विद्यापीठांचे कोलॅबरेशन असल्याचे मत व्यक्त केले.

29 NOV 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समिती ठरविणार 'निती', मगच उपकेंद्राला 'गती'

## शिवाजी विद्यापीठाच्या सांगलीतील उपकेंद्रासाठी समिती स्थापन

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सांगली जिल्ह्यात करण्यासाठी जनरेटा वाढत आहे. उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही विद्यापीठाने प्रस्ताव दिल्यास दोन मिनिटांत उपकेंद्राला मंजुरी देऊ, असे सांगितले आहे. या उपकेंद्रासाठी व्यवस्थापन परिषदेने सात सदस्यांची समिती स्थापन केली आहे. उपकेंद्रासाठी जागा, अभ्यासक्रम व मनुष्यबळ यांचे धोरण ठरवून त्याचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. या अहवालानंतरच विद्यापीठ प्रशासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविणार आहे.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत २८६ महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांचा कार्यालयीन संबंध थेट विद्यापीठाशी येत असतो. मात्र, सांगली व सातारा जिल्ह्यांतील अनेक तालुके हे विद्यापीठापासून दीडशे किलोमीटर अंतरावर आहेत. तेथून विद्यापीठात येणे विद्यार्थी, शिक्षकांना शक्य नाही.

राज्य सरकारने २०१६ मध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विद्यापीठ स्थापन करण्याचे धोरण आखले. त्यानंतर सांगली जिल्ह्यात उपकेंद्र स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यासाठी जिल्ह्यात आटपाडी, जत, शिराळा, मिरज येथे उपकेंद्र व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आग्रह धरला. मात्र, येथील कोणत्याच जागेवर एकमत न झाल्याने हा विषय रेंगाळत पडला. मात्र, आता पुन्हा या विषयाने उचल खाल्ली आहे.

**समितीचे काम काय असणार**

उपकेंद्रासाठी स्थापन केलेल्या समितीची लवकरच बैठक होणार आहे. उपकेंद्रात कोणते अभ्यासक्रम असावेत, उपकेंद्रासाठी जागा, उपलब्ध मनुष्यबळ याचा अभ्यास करून अहवाल तयार केला जाणार आहे. तो अहवाल आल्यानंतर विद्यापीठ उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाकडे उपकेंद्रासाठीचा प्रस्ताव पाठविणार आहे. सध्या तरी भाड्याच्या जागेत उपकेंद्र सुरू करण्याचा मतप्रवाह आहे. (पूर्वार्ध)






### उपकेंद्र सांगलीत, सदस्य कोल्हापूरचे..

विद्यापीठाने स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीत बहुतांशी सदस्य हे कोल्हापूरचे असल्याने उपकेंद्र सांगलीत होणार आणि त्याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञ मात्र कोल्हापूरचे का, अशी विचारणा सांगलीतून झाली.

सांगलीत उपकेंद्र स्थापन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सकारात्मक आहे. त्यासाठी समितीही स्थापन केली आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर सरकारकडे प्रस्ताव पाठविणार आहोत.
**- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

सांगली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विद्यापीठात जावे लागते. त्यामुळे जिल्ह्यात विद्यापीठाचे उपपरिसर केंद्र सुरू करावे. त्यात जिल्ह्यात नसणारे अभ्यासक्रम सुरू व्हावेत.
**- संजय परमणे,** सदस्य, व्यवस्थापन परिषद

उपकेंद्र स्थापन करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीची लवकरच बैठक घेणार आहे. या उपकेंद्रात कोणते अभ्यासक्रम असावे यावर अभ्यास करून अहवाल तयार केला जाईल.
**- डॉ. व्ही. एम. पाटील,** अध्यक्ष, उपकेंद्र निर्मिती समिती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2023
Times of India

# SUK sub-centre in Sangli will get immediate approval: Patil

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Higher and technical education minister Chandrakant Patil, while speaking in Sangli, said if there is a proposal for a sub-centre of Shivaji University Kolhapur (SUK) in Sangli, it will be given approval within two minutes and can be started in the next educational year at a rented place temporarily till the land is allotted for the same.

There has been a demand for SUK sub-centre at Sangli for the past few years.

During a conference organised in Sangli by Lokseva Charitable Trust and University Development Forum on Monday, Patil said, "Universities are autonomous. They are free to make any decision. Hence, if a proposal is made for a sub-centre in Sangli, we will approve it immediately. Place, subsidy, manpower and basic facilities, everything will be provided for the sub-centre. Liability funds are widely available with various institutions across the state. From this, specific funds per year can be given for the sub-centre."

One of the conference attendees, Sanjay Parmane, said, "Although the sub-centre does not have its own space, it can be started at a rented space for now. We will make such a proposal from the senate committee that this sub-centre should be started here from June 2024."

While Shivaji University senate member Srinivas Gaikwad said, "The proposal for a sub-centre in Sangli has been in discussion for many years. If minister Chandrakant Patil takes it to heart, it can be brought into reality very soon."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 NOV 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला १० हजार २९४ विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेला १० हजार २९४ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी ५१ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना सुरुवात झाली आहे. मंगळवारी मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ सोशल वर्क, बीएस्सी, एमएस्सी (नॅनो सायन्स), मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग अभ्यासक्रमाची परीक्षा झाली. दरम्यान, दि. २८ रोजी बॅचलर ऑफ इंटिरिअर डिझाईनच्या विविध सत्रांचे निकाल घोषित करण्यात आले. आजअखेर ९१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. भरारी पथकाकडून सांगली जिल्ह्यातून चार गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2023
सकाळ




कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. नंदकुमार मोरे. शेजारी प्रा. अशोक चौसाळकर, प्रा. राजदीप सुर्वे.

# फुलेंच्या साहित्यात मानवमुक्तीचा विचार

## प्रा. नंदकुमार मोरे यांचे प्रतिपादन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : 'महात्मा फुले कृतिशील समाजसुधारक असून, त्यांचे विचार कृतीतून शोधावे लागतात', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आज येथे केले. 'फुलेंच्या साहित्यात मानवमुक्तीचा विचार आढळतो. ते प्रयोगशील साहित्यिक होते', असेही त्यांनी सांगितले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे महात्मा फुले यांच्या १३३ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'महात्मा जोतीराव फुले यांचे साहित्यविषयक विचार' विषयावर त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. अशोक चौसाळकर अध्यक्षस्थानी होते. राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमधील मिनी हॉलमध्ये व्याख्यान झाले.

डॉ. मोरे म्हणाले, 'काळाची आव्हाने पेलून फुले यांनी संवेदनशील लेखन केले. त्यांची निरीक्षणे व विधानांतून त्यांचे भाषा व साहित्य विचार विस्ताराने कळतात. सुरुवातीच्या काळात मुंबई साहित्याचे केंद्र होते. त्यानंतर ते पुणे येथे स्थलांतरित झाले. या साहित्य वर्तुळात फुले यांचे लेखन वेगळे ठरते. मानवमुक्तीचा विचार त्यात आढळतो. त्यांचे वाचन चौफेर होते. ते इतिहासकार नव्हते. मात्र, त्यांच्याकडे इतिहासाकडे पाहण्याची चिकित्सक स्वतंत्र दृष्टी होती. त्यांनी भ्रष्ट इतिहासाचे विवेचन करत त्याचा भांडाफोड केला.'

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'सत्यशोधक समाजाच्या स्थापनेस १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतून फुले यांना काढले, तर महाराष्ट्राचे स्थान शून्य राहते. फुले यांना साहित्यिक दृष्टी होती.' यावेळी राजदीप सुर्वे, प्रा. डॉ. अवनीश पाटील, चंद्रकांत यादव, नामदेव कांबळे उपस्थित होते. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

29 NOV 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोबाइलच्या अतिवापराने मानसिक आरोग्य धोक्यात

## सत्यजित देसाई : शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मोबाइलचा अतिवापर होत असल्याने नागरिकांचे मानसिक आरोग्य धोक्यात येत आहे, अशी भीती शिवाजी विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागातील समुपदेशक सत्यजित देसाई यांनी व्यक्त केली. एम. ए. मास कम्युनिकेशन विभागात 'मानसिक आरोग्य' या विषयावर ते बोलत होते.

देसाई म्हणाले, आजच्या काळात माणसाची जीवनशैली धावपळीची झाली आहे. वाढत्या गरजा, बदलता आहार आणि तंत्रज्ञानाचा गरजेपेक्षा होणारा जास्त वापर यामुळे लोकांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. मोबाइलचा अतिरेकी वापर हे एक प्रकारचे व्यसन आहे. मोबाइलच्या सततच्या अमर्याद वापराने चीडचीड होत असते. अवेळी झोपणे, योग्य आहार न घेणे याचाही मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. माणसाच्या वाढत्या गरजा आणि. अपेक्षा आणि त्यात नेहमी असमाधानी राहण्यामुळे बौद्धिक क्षमतेवर ताण येतो. याचा शरीरावरही प्रतिकूल परिणाम होतो. यासाठी माणसांनी एकमेकांशी संवाद साधणे गरजेचे आहे. आनंदी राहण्यासाठी पुस्तकांचे वाचन आणि प्रवास करायला हवा.



शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमात सत्यजित देसाई यांनी मार्गदर्शन केले.

मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रसाद ठाकूर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. अक्षय जहागीरदार याने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 NOV 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात १ डिसेंबरला गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. सावंत यांचे विशेष व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात १ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात होणाऱ्या व्याख्यानात मुख्यमंत्री डॉ. सावंत 'आत्मनिर्भर भारत व युवकांचे योगदान' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस.पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. व्याख्यान कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही.एन.शिंदे यांनी केले आहे.